दै. कुलस्वामिनी संदेश

बुधवार दि.०५ फेब्रुवारी २०२०

# श्रमचळवळीतून सुसंस्कृत समाज निर्मिती शक्य : तहसीलदार श्री. सुरेश घोळवे




देवणी : श्रमचळवळीतून संघर्षाची प्रेरणा मिळते. संघर्ष करणारेच काळाच्या ओघात टिकून राहतात म्हणून श्रमप्रतिष्ठा गरजेची आहे. श्रमचळवळीतून सुसंस्कृत समाज निर्मिती शक्य आहे. असे प्रतिपादन तहसीलदार श्री.सुरेश घोळवे यांनी केले. कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर मानकी (ता. देवणी) येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. अर्चनाताई सुभाष बिरादार उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे यांनी केले. रासेयोची तत्वे उद्दिष्टे व राष्ट्र निर्मितीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान याविषयी त्यांनी सविस्तरपणे माहिती दिली. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत भंडे यांनी विद्यार्थ्यांनी समाजापुढील आव्हाने दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. सक्षम युवक देशाचा खरा आधार आहे. जगातील इतर देशापेक्षा सर्वाधिक तरुणांची संख्या भारतात आहे. देशाला महासत्ता बनवण्यासाठी युवकांनी आपले योगदान द्यावे. युवकांना घडविण्याचे कार्य रासेयोमधून होते असे प्रतिपादन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, सहकार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमाणी,डॉ. श्रीधर बनसोडे , डॉ. विजय मोरे,डॉ. सुलोचना डेंगाळे,डॉ. अनिरुद्ध बावरे, उपसरपंच माधवराव बिरादार, ग्रा. पं.सदस्य चांदपाशा सय्यद, भोपणीचे सरपंच शिवाजी जगताप, मुख्याध्यापक तानाजी बिरादार, सौ. भंडे मॅडम यांची उपस्थिती होती.

डॉ. श्रीधर बनसोडे यांनी रासेयो गीताचे गायन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय माने यांनी केले. आभार प्रदर्शन बिरादार परमेश्वर या विद्यार्थ्याने केले. या कार्यक्रमास गावातील नागरिक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
... रसिका महाविद्यालय देवणी

Principal
... Mahavidyalaya,
... Dist.Latur

लातूर

**दै. कुलस्वामिनी संदेश** शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी २०२०

# खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक कृतींची गरज



देवणी/प्रतिनिधी : शहरातील अनियंत्रित लोकसंख्येचा विस्फोट धोकादायक आहे. त्यासाठी खेडे स्वयंपूर्ण करणे गरजेचे आहे. खेड्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सामूहिक कृतींची गरज आहे, त्यासाठी सर्व गावकरी व एनएसएसच्या स्वयंसेवकांनी एकत्र येणे गरजेचे आहे. "निसर्ग नियमांचे तंतोतंत पालन केले नाही तर निसर्ग आपल्याला फार मोठा धडा शिकवतो. असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी श्री उज्वलकुमार कुलकर्णी यांनी केले. कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर मौजे मानकी (ता. देवणी)येथे संपन्न झाले. या शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत भंडे यांनी प्रतिकूल परिस्थितीत जगण्याचे व स्वतःला घडविण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना मधून मिळते. असे प्रतिपादन केले.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. नारायण बिरादार, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे, सहकार्यक्रमाधिकारी डॉ गोपाल सोमाणी यांची उपस्थिती होती.यावेळी गावकऱ्यांच्या वतीने शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार करून भावपूर्ण निरोप देण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. वैशाली चटगे, डॉ. रेणुका कुणाळे, प्रा. अंकुश भास्कर, डॉ. अनिरुद्ध बावरे यांच्यासह गावकरी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलदीप भोसले यांनी केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे यांनी शिबिर काळातील कार्यांची माहिती देऊन आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

प्राचार्य
Kai Rasika Mahavidyalaya
DEONI

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

# देशोन्नती

नांदेड, शुक्रवार, दि. १४ फेब्रुवारी २०२० पृष्ठे ८+८ मूल्य रु. ५

तुरळून लातूर येथे आगमन व प्रयाण करतील. युवानेते अमर पाटील यांच्या वतीने ... आले आहे.

## खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक कृतींची गरज

### उज्ज्वलकुमार कुलकर्णी यांचे प्रतिपादन

देवणी ■ तालुका प्रतिनिधी

शहरातील अनियंत्रित लोकसंख्येचा विस्फोट धोकादायक आहे, त्यासाठी खेडे स्वयंपूर्ण करणे गरजेचे आहे. खेड्यांचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सामूहिक कृतींची गरज आहे, त्यासाठी सर्व गावकरी व एनएसएसच्या स्वयंसेवकांनी एकत्र येणे गरजेचे आहे. निसर्ग नियमांचे तंतोतंत पालन केले नाही तर निसर्ग आपल्याला फार मोठा धडा शिकवतो, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी उज्ज्वलकुमार कुलकर्णी यांनी केले.

कै. रसिका महाविद्यालय देवणी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर देवणी तालुक्यातील मानकी येथे संपन्न झाले. या शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत भंडे यांनी प्रतिकूल परिस्थितीत जगण्याचे व स्वतःला घडविण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना मधून मिळते, असे प्रतिपादन केले. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष नारायण बिरादार, उपप्राचार्य डॉ. शिवाजी सोनटक्के, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे, सहकार्यक्रमाधिकारी डॉ गोपाल सोमाणी यांची उपस्थिती होती. यावेळी गावकऱ्यांच्या वतीने शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार करून भावपूर्ण निरोप देण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. वैशाली चवगे, डॉ. रेणुका कुणाळे, प्रा. अंकुश भास्कर, डॉ. अनिरुद्ध बावरे यांच्यासह गावकरी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलदीप भोसले यांनी केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. आर. मोरे यांनी शिबिर काळातील कार्याची माहिती देऊन आभार प्रदर्शन केले.




देवणी : मानकी येथील कै. रसिका महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना शिबिर प्रसंगी गटशिक्षणाधिकारी उज्ज्वलकुमार कुलकर्णी, प्राचार्य प्रशांत भंडे, नारायण बिरादार, शिवाजी सोनटक्के, प्रा. रेणुका कुणाळे आदी.